क्र.आयुक्त/मगांराग्रारोहयोमहा/आस्था/ 1087 /2013.
आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स,
जुने सचिवालय इमारत,नागपूर
दिनांक 5/9/2013

प्रति,

उपजिल्हाधिकारी (रोहयो), सर्व
उपमुख्यकार्यकारी अधिकारी (पंचायत) सर्व } मार्फत उपजिल्हाधिकारी (रोहयो)
MIS समन्वयक सर्व

**विषय :- e-FMS प्रणाली मधील Digital signature व्यवस्थापनाबाबत.**

राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये e-FMS प्रणालीचा वापर सुरू असून या प्रणालीमध्ये FTO तयार करण्यासाठी दोन प्राधिका-यांच्या Digital Signatures Nrega Soft वर enroll केलेल्या असणे आवश्यक असते. ब-याच वेळा या दोन पैकी एका प्राधिका-याची Digital Signature बदली, सेवानिवृत्ती, रजा अथ्वा Revalidation या कारणांमुळे बदलावी लागण्याची शक्यता असते. अशावेळी आयुक्तालय, मगांराग्रारोहयो-महा. नागपूर यांचेकडे या बाबतचा अहवाल पाठवून Nrega Soft वरून अशा प्राधिका-याची Digital Signature वगळून (delete) घ्यावी लागते. आता पर्यंत अशा प्रकरणाबाबत e-mail व्दारे अहवाल प्राप्त झाल्यानंतर वगळण्याची कार्यवाही केली जात होती. तथापी Digital Signature वगळणे ही एक कायदीय जबाबदारीची प्रक्रीया असल्यामुळे सदर कार्यवाही करण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यप्रणाली ठरवून देण्यात येत आहे.

1. Digital Signature वगळण्या बाबतचा प्रस्ताव उपजिल्हाधिकारी/उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सोबत जोडल्यानुसार विहित नमुन्यात पाठविण्यात यावा.
2. प्रस्तावासोबत बदली आदेश व CTC ची प्रत जोडलेली असावी.
3. प्रस्तावामध्ये Digital Signature वगळण्याचे कारण, वगळणी करावयाच्या अधिका-याचे पूर्ण नांव व नव्याने enroll करण्यात येणा-या अधिका-याचे पूर्ण नांव नमूद असावे.
4. वगळणी करावयाच्या अधिका-याच्या Digital Signature व्दारे तयार केलेले कोणतेही FTO प्रलंबित नसावे. Transaction पूर्ण झालेले असावे.

वरीलप्रमाणे माहिती व सहपत्र प्राप्त झाल्याशिवाय वगळणीची कार्यवाही केली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. मगांराग्रारोहयो आयुक्तालय नागपूर या कार्यालयातील सहायक आयुक्त (आस्थापना) यांना या कार्यवाहीसाठी प्राधिकृत केलेले असून वगळणीबाबतचा प्रस्ताव त्यांचेकडे acmgnregs@gmail.com या ID वर मेल व्दारे पाठवून आवश्यकतेनुसार 0712-6473887/9 या दुरध्वनीक्रमांकांवर संपर्क साधावा.

आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना महाराष्ट्र,
नागपूर करीता